<u>प्रेस नोट</u> दि.१३/०५/२०१९

**कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**वेश्या व्यवसायातून पीडित मुलीची सुटका**

दि.०९/०५/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील पोलीस नाईक सचिन कदम यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे झिशान खान व फैजल खान हे वेगवेगळया हॉटेलमध्ये बाहेरील राज्यातील मुलींना बोलावून त्या मुलींची पंचतारांकित हॉटेलमध्ये राहण्याची सोय करून, तिचेकडे गिर्‍हाईक पाठवून ग्राहकांच्या मागणीनुसार हॉटेलवर वेश्या गमनासाठी मुली पाठवितात व ते वेश्या गमनाचे पैसे स्वीकारून, त्यातून स्वतःसाठी ठराविक हिस्सा काढून घेवून त्यावर स्वतःची उपजीविका भागवितात, अशी बातमी मिळाल्याने, सदर बातमीप्रमाणे सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील पोलीस निरीक्षक, श्रीमती मनिषा झेंडे व स्टाफसह हॉटेल पार्क सेंट्रल, रूम नं.३०१, कोरेगाव पार्क, पुणे येथे जावून छापा घातला असता छाप्यामध्ये दिल्ली येथील पीडित मुलगी मिळून आली. सदर मुलीकडून आरोपींचे नावे, पत्ते मिळवून (१) फैजल मेहताब खान वय २१ वर्षे रा. सलीमपुर खाज अन्सारी मशिदजवळ, मुरादाबाद उत्तरप्रदेश (२) झिशान नौशाद खान, वय २२ वर्षे, रा. सदर यांना व त्यांचेकडील ते वेश्या व्यवसायाकरिता वापरत असलेले चार मोबाईल जप्त करून त्यांना हजर केले. सदर दोन्ही आरोपींना कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे कडील पोलीस उप निरीक्षक श्री. निलेश गायकवाड यांनी तात्काळ अटक करून, नमूद पीडित मुलीची वेश्या व्यवसायातून सुटका करण्यात आलेली आहे व तिस रेस्क्यु फाऊंडेशन, हडपसर, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे.

सदर नमूद गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.गणेश माने, पो.नि. (गुन्हे) कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर हे करीत आहेत.

(मदन बहाद्दरपुरे)<br>
वरिष्ठ पोलीस निरीक्षक<br>
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे